आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१ जून २०२४ - शनिवार

लोकसभेच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी आठ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशांमधल्या ५७ मतदारसंघात आज मतदान सुरू आहे. यासाठी दुपारी एक वाजेपर्यंत ४० पूर्णांक ९ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. हिमाचल प्रदेशमध्ये सर्वाधिक ४८ पूर्णांक ६३ शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे. तर बिहारमध्ये ३५ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान झालं आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या चार जागांपैकी नाशिक विभागीय शिक्षक मतदार संघासाठी काल पहिल्या दिवशी दोन उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. भाजपचे विवेक कोल्हे यांच्यासह अहमदनगर इथले छगन पानसरे यांनी अर्ज दाखल केले आहेत. विवेक कोल्हे यांनी आज अपक्ष उमेदवारी म्हणूनही अर्ज दाखल केला. दरम्यान काल दिवसभरात ३९ इच्छुकांनी अर्ज नेल्याची माहिती निवडणूक प्रशासनानं दिली. यात नाशिक विभागीय शिक्षक मतदार संघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांचाही समावेश आहे.

**(प्रोमो)**

**<><><><><>**

पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नसल्याचं पाकिस्तान सरकारने इस्लामाबाद उच्च न्यायालयात कबूल केलं आहे. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधले पत्रकार अहमद फरहाद शाह यांच्यावर सुरू असलेल्या खटल्यावेळी पाकिस्तान सरकारने न्यायालयाला हे सांगितलं. काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नाही तर पाकिस्तानी लष्कर या भागात का जातं, असा प्रश्नही न्यायालयानं यावेळी सरकारला विचारला.

<><><><>

देशात विजेची मागणी वाढलेली असतानाही, औष्णिक वीज प्रकल्पातील कोळशाचा सद्यस्थितीतला साठा ४५ मेट्रिक टनांपेक्षा जास्त असल्याचे कोळसा मंत्रालयाने म्हटले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा साठा ३० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे मंत्रालयाने कळवलं आहे. देशाची १९ दिवसांची गरज भागविण्यासाठी हा साठा पुरेसा असेल, येत्या १ जुलैपर्यंत औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ४२ मेट्रीक टन कोळसा उपलब्ध होईल, असंही मंत्रालयानं कळवले आहे.

<><><><>

पुण्यातल्या कल्याणीनगर कार अपघातात अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अगरवाल हिला काल पुणे पोलिसांनी अटक केली. शिवानी हिच्यावर आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलून त्याला बाहेर पडण्यासाठी मदत केल्याचा आरोप आहे. शिवानी हिला आज पुणे न्यायालयात हजर केलं. या प्रकरणी गुन्हे शाखेनं न्यायवैद्यक प्रयोगशाळेत काम करणाऱ्या दोन महिला परिचारिकांचीही चौकशी केली आहे.

<><><><>

पुणे कार अपघात प्रकरणात राज्य सरकार आणि पोलीस योग्यप्रकारे कारवाई करत असल्याचं उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते पुण्यात बातमीदारांशी बोलत होते. याप्रकरणात कोणतीही लपवाछपवी किंवा कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रकार होत नसून, ही घटना घडल्यापासून आजपर्यंत चौकशीत जे जे दोषी आहेत, त्यांच्यावर कारवाई होताना दिसत असल्याचं म्हणत, विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले.

<><><><>

सलग दुसऱ्या वर्षी सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या स्थानी असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्र सरकारच्या उद्योग आणि व्यापार प्रोत्साहन विभागानं जारी केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १ लाख २५ हजार १०१ कोटी रुपयांची गुंतवणूक आल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातली गुंतवणूक ही गुजरातमध्ये गेलेल्या एकूण गुंतवणुकीच्या दुपटीपेक्षा अधिक असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

नाशिकचे नवीन विभागीय आयुक्त म्हणून  डॉ. प्रवीण गेडाम यांनी काल कार्यभार स्वीकारला. मावळते आयुक्त राधाकृष्ण गमे ३७ वर्षाच्या शासकीय सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले. संवाद प्रणालीतल्या  सुलभतेसह विविध कामं  आपण आपल्या कारकिर्दीत करू शकलो याबद्दल गमे यांनी यावेळी आभार मानले.

<><><><>

पहिला रामतीर्थ गोदा राष्ट्र जीवन पुरस्कार श्री राम जन्मभूमी ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद देवगिरी महाराज यांना देण्यात आला. रामतीर्थ गोदावरी सेवा समितीतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार काल रात्री नाशिकच्या पंचवटी इथं गोदाघाटावर प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि महादक्षिणा असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

<><><><>

राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्यानं ७१वी राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धा पुण्यात होणार आहे. वरिष्ठ पुरुष गटाची स्पर्धा १३ ते १६ जुलै तर आणि महिला गटाची स्पर्धा १७ जुलै ते २० जुलै या कालावधीत बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात होईल.

यामध्ये ३१ संघ सहभागी होणार असून, या स्पर्धा मॅटवर होणार असल्याची माहिती राज्य संघटनेचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी दिली.

//<><><><><>//